देवतांची उपासना : खंड ५

# मारुति

## (शास्त्रीय विवेचन आणि उपासना)

मराठी (Marathi)

संकलक

हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे

सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले

पू. संदीप गजानन आळशी

सनातन संस्था

प्रस्तुत पुनर्मुद्रणाच्या ३,००० प्रती आणि या
लघुग्रंथाच्या आतापर्यंत १ लक्ष ८ सहस्र १५० प्रती प्रकाशित !

# अनुक्रमणिका

卐 सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचा संक्षिप्त परिचय ५

卐 मारुतीच्या माहितीचे महत्त्व ७

卐 मनोगत ८

१. जन्माचा इतिहास १०

२. कार्य आणि वैशिष्ट्ये ११

३. मूर्तीविज्ञान (रंग, रूप आदी) १८

४. शनि आणि मारुति २६

५. यक्ष आणि मारुति ६. गणपति आणि मारुति २८

७. संतांनी सांगितलेले मारुतीचे महत्त्व ८. उपासना २९

९. आपल्या जीवनातील मारुति ४८

卐 मारुतीची आरती (अर्थासह) ४९

卐 प्रस्तुत लघुग्रंथाचे असामान्यत्व लक्षात घ्या ! ५३

卐 संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती ५५

# सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय

१. अध्यात्माच्या प्रसारासाठी ‘सनातन संस्थे’ची स्थापना !

२. ‘गुरुकृपायोग’ या साधनामार्गाचे जनक !

३. हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

४. ग्रंथ-निर्मिती : डिसेंबर २०२३ पर्यंत ३६४ ग्रंथांच्या १३ भाषांत ९४ लाख ९३ सहस्र प्रती !

५. शारीरिक, मानसिक, तसेच वाईट शक्तींच्या त्रासांवरील उपायपद्धतींविषयी संशोधन

६. ‘सनातन प्रभात’ नियतकालिकांचे संस्थापक-संपादक !

७. ‘हिंदु राष्ट्रा’च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्ववादी आदींचे संघटन आणि त्यांना दिशादर्शन !

(संपूर्ण परिचयासाठी वाचा – ‘**www.Sanatan.org**’.)

## मारुतीच्या माहितीचे महत्त्व

आध्यात्मिक उन्नतीसाठी ‘पिंडी ते ब्रह्मांडी’ असा प्रवास करायचा असतो. त्याचा अर्थ असा की, ‘ब्रह्मांडात’ म्हणजे शिवात जी तत्त्वे आहेत, ती ‘पिंडात’ म्हणजे जिवात यायला हवीत; तरच तो जीव शिवाशी एकरूप होऊ शकतो. पाण्याच्या थेंबात तेलाचा अल्पसा अंश असल्यास तो पाण्याशी एकरूप होऊ शकत नाही. त्याचप्रमाणे मारुतीभक्तात मारुतीची सर्व वैशिष्ट्ये असल्याविना तो मारुतीशी एकरूप होऊ शकणार नाही, म्हणजेच त्याला सायुज्य मुक्ती मिळणार नाही. यासंदर्भात या लघुग्रंथात दिलेली मारुतीची वैशिष्ट्ये मार्गदर्शक वाटतील. श्री गणपति, श्रीविष्णु, श्रीराम, शिव, शक्ती, श्री सरस्वती, दत्त अन् श्रीकृष्ण यांच्याविषयी शास्त्रीय ज्ञान देणारे लघुग्रंथही उपलब्ध आहेत.

**टीप** ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.

## मनोगत

बहुतेकांना देवाविषयी जे थोडेफार ज्ञान असते, ते बहुधा त्यांनी लहानपणी वाचलेल्या किंवा ऐकलेल्या गोष्टींमुळे असते. अशा अल्प ज्ञानामुळे त्यांचा देवावरचा विश्‍वासही थोडाफारच असतो. देवतांविषयी अधिक ज्ञान मिळाल्यास जास्त विश्‍वास निर्माण होण्यास साहाय्य होते. विश्‍वासाचे रूपांतर पुढे श्रद्धेत झाल्याने उपासना आणि साधनाही चांगल्या प्रकारे होते. तसे व्हावे म्हणून या लघुग्रंथात मारुतीविषयी इतरत्र बहुधा न दिलेले पण उपयुक्त असे अध्यात्मशास्त्रीय ज्ञान देण्यावर विशेष भर दिला आहे.

हा लघुग्रंथ वाचून प्रत्येकाला अधिकाधिक साधना करण्याची स्फूर्ती मिळो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**

गणेशभक्ती वाढवणारा सनातनचा लघुग्रंथ !

**श्री गणपति अथर्वशीर्ष**

**आणि संकष्टनाशन गणेशस्तोत्र (अर्थासह)**